16 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सेमिकंडक्टर’च्या संशोधनाला यूके सरकारचे पेटंट

## विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील पाच संशोधकांची कामगिरी

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील डॉ. अविराज कुळदीप, राहुल माने, किशोर खोत, सुहास मोहिते आणि के. एम. गरडकर यांनी ‘वेस्ट टू वेल्थ’ या संकल्पनेवर आधारित सेमिकंडक्टर फोटोकॅटालिस्टची निर्मिती केली. त्यांच्या या संशोधनासाठी यूके सरकारचे डिझाईन पेटंट जाहीर झाले आहे.

जुलै २०२३ मध्ये डॉ. कुळदीप यांची केंद्र सरकारच्या ‘स्वच्छता सारथी फेलोशिप’साठी निवड झाली. त्यामध्ये त्यांनी ‘पंचगंगा नदीचे दूषित पाणी, त्याचे कोल्हापूर व इचलकरंजी शहरांमधील प्रदूषणाचे उगम स्थान व प्रदूषित पाण्यावर सेमिकंडक्टर फोटोकॅटालिस्टचा उपाय’ याबाबतची माहिती सादर केली. त्याला यूके सरकारचे पेटंट मिळणे ही शिवाजी विद्यापीठासाठी सन्मानाची बाब आहे.


अविराज कुळदीप


राहुल माने


किशोर खोत


सुहास मोहिते


के. एम. गरडकर

> ‘शहरांमधील प्रदूषणाचे उगमस्थान आणि प्रदूषित पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. अशा स्थितीत सेमिकंडक्टर फोटोकॅटालिस्ट संशोधनाची मदत, उपयोग प्रदूषित पाणी हे स्वच्छ आणि प्रदूषणविरहित करण्यासाठी होणार आहे.
>
> **- डॉ. राहुल माने**

भारत सेमिकंडक्टर उत्पादन परिसंस्था निर्माण करण्यासाठी वचनबद्ध आहे आणि इलेक्ट्रॉनिक्सवर लक्ष केंद्रित करून तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करत आहे. दळणवळण, संरक्षण, ऑटोमोबाईल्स आणि संगणकीय उपकरणांसह जवळजवळ सर्व क्षेत्रांमध्ये सेमिकंडक्टरचे अनुप्रयोग आहेत. जागतिक सेमिकंडक्टर क्षेत्राच्या वाढीमध्ये भारताची मोठी भूमिका आहे आणि सेमिकॉन इंडिया भारतातील सेमिकंडक्टर इकोसिस्टमला आकार देणाऱ्या विविध पैलूंवर विचारमंथन करण्यासाठी एक व्यासपीठ देईल.

याच अनुषंगाने डॉ. कुळदीप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सेमिकंडक्टर फोटो कॅटलिस्टचा उपयोग प्रदूषित पाणी प्रदूषणरहित करण्यासाठी केला. त्याला यूके सरकारचे पेटंट जाहीर झाले असल्याची माहिती डॉ. माने यांनी दिली. या संशोधकांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. जी. एस. राशिनकर यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2024
सकाळ

# शारीरिक तंदुरुस्तीसाठी खेळ आवश्यक

## साधना पाटील : विद्यापीठीय आंतरविभागीय ज्युदो स्पर्धेला प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : 'खेळामुळे शरीर, मन तंदुरुस्त राहते. शारीरिक तंदुरुस्तीसाठी खेळ आवश्यक आहे. त्यामुळे एखादा तरी खेळ अवश्य खेळा,' असा सल्ला महापालिका उपायुक्त साधना पाटील यांनी दिला. यशवंतराव चव्हाण के.एम.सी. कॉलेजच्या वतीने क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलात आयोजित शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय ज्युदो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

पाटील म्हणाल्या, 'सरकार आणि शिवाजी विद्यापीठाने खेळाडूंसाठी अनेक योजना जाहीर केल्या आहेत. त्याचा फायदा खेळाडूंनी मेहनत करून आणि गुणवत्ता सिद्ध करून घ्यावा. सध्या खेळ हे एक करिअर झाले आहे. त्यासाठी जिद्द, चिकाटी गरजेची आहे.'

स्पर्धेत कोल्हापूरसह सातारा, सांगली येथील १२५ हून अधिक मुले-मुली सहभागी झाले आहेत. स्पर्धेतून भोपाळ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड केली जाणार आहे. निवड समिती सदस्य म्हणून डॉ. धनंजय पाटील, डॉ. विनायक भागवत, डॉ. राम पवार काम पाहणार आहेत.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे व प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे, महाविद्यालयाचे आय.क्यू.एस.सी समन्वयक डॉ. एस. पी. कांबळे, प्रा. ए. डी. मुडे, प्रा. सचिन धुरवे, डॉ. युवराज मोटे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण के. एम. सी. कॉलेजतर्फे आयोजित आंतरविभागीय ज्यूदो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महापालिका उपायुक्त साधना पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. शरद बनसोडे, प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. धनंजय पाटील, डॉ. राम पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2024
पुण्यनगरी

# लिओनिड उल्कावर्षाव पाहण्याची उद्या संधी

**कोल्हापूर :** खगोलप्रेमींसाठी एक खास पर्वणी येत आहे. रविवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी रात्री १२ नंतर सिंह राशीतील मघा नक्षत्रात 'लिओनिड' उल्कावर्षाव पाहायला मिळणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली आहे. उल्कावर्षाव पाहण्यासाठी नागरिकांनी शहराच्या बाहेर जाऊन निरीक्षण केल्यास उल्कावर्षाव चांगला दिसण्याची शक्यता आहे.

पृथ्वी जेव्हा सूर्याभोवतीच्या भ्रमणात दरवर्षी '५५ पी टेंपल टटल' या धूमकेतूच्या मार्गातून जाते, तेव्हा या धूमकेतूच्या मार्गात असलेले धूलिकण पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे खेचले जातात. हे धूलिकण जेव्हा पृथ्वीच्या वातावरणात शिरतात तेव्हा वातावरणातील हवेशी होणाऱ्या घर्षणामुळे जळून जातात. त्यामुळे उल्कांची प्रकाशित रेषा आपणास दिसते. हे धूलिकण ७५ ते १०० किलोमीटर उंचीवर दर सेकंदास ७२ किलोमीटर या वेगाने वातावरणात शिरतात. यावर्षी आकाशात चंद्र प्रकाशाचा अडथळा येणार आहे. तरीही तासाला १०-१५ उल्का सिंह राशीतून पडताना दिसतील.